जा.क्र./स्त्रीरोग प्र.तंत्र./      /२०२४
स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभाग
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,
जळगाव.
दि.२३/०४/२०२४

प्रति,
मा. अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगाव

**विषय :-** HPV लसीकरण जनजागृती उपक्रम.

मा. महोदय,

आयुष संचालक आदरणीय डॉ. रामन घुंगराळेकर सर यांच्या मार्गदर्शनाने व प्रभारी अधिष्ठाता डॉ. अभिजीत अहिरे सर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मिलिंद कांबळे, स्त्रीरोग व प्रसूतितंत्र विभाग प्रमुख डॉ. भाग्यश्री खोत यांच्या प्रयत्नाने शासकीय आयुर्वेद महाविद्यालय जळगाव येथे स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभाग आणि Serum Institute Pune यांच्या संयुक्त विद्यमानाने दि. १९/०४/२०२४ रोजी "HPV लसीकरण जनजागृती उपक्रम" राबविण्यात आला. या उपक्रमाची सुरुवात धन्वंतरी पूजनाने झाली. स्त्रीरोग व प्रसूतितंत्र विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सोनाली फराटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व HPV लसीकरणाचे महत्व सांगितले. स्त्रीरोग व प्रसूतितंत्र विभागातील सहयोगी प्राध्यापिका डॉ. स्वाती बळी यांनी HPV संसर्ग व त्यावरील आयुर्वेदिक व आधुनिक उपचार याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. स्त्रीरोग व प्रसूतितंत्र विभागातील आंतरवासियता प्रशिक्षणार्थी या कार्यक्रमात सक्रीय सहभागी झाले होते. त्यामधील ज्ञानेश्वर कागळे या विद्यार्थ्याने HPV (Human Papilloma Virus) बद्दल Pathology सांगितली. त्यानंतर निकिता कदम या विद्यार्थिनीने गर्भाशय मुखाचा कर्करोगाची लक्षणे तसेच हर्षाली करांडे या या विद्यार्थिनीने तपासण्या आणि लसीकरण याची सविस्तर माहिती दिली. Serum Institute मार्फत उपस्थित असलेले श्री पवार यांनी Cervavac Vaccine बद्दल माहिती दिली. निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मिलिंद कांबळे यांनी HPV लसीकरण जनजागृती साठी प्रोत्साहन दिले. प्रभारी अधिष्ठाता डॉ. अभिजित अहिरे सर यांनी जास्तीत जास्त उपस्थितांनाVaccine घेण्यासाठी आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आंतरवासियता प्रशिक्षणार्थी स्नेहा केदार या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील अध्यापक, विद्यार्थी, रुग्णालयातील Nursing Staff, उपस्थित होता. कार्यक्रमाची पूर्वतयारी आंतरवासियता प्रशिक्षणार्थी नितिश कांबळे, सृष्टी खवशी व दिव्यश्री खरात यांनी केली. आभार प्रदर्शन आचल कदम या विद्यार्थिनीने केले व कार्यक्रमाचा समारोप झाला.

विभाग प्रमुख
प्रसूती तंत्र व स्त्रीरोग
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगाव.

# HPV लसीकरण जनजागृती उपक्रमाचे फोटो (१९/०४/२०२४)










महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
राष्ट्रीय सेवा योजना
भारतात
पुरुषांमध्ये






महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
राष्ट्रीय सेवा योजना
भारतात
गर्भाशयमुखाच्या
दर ८ मिनिटांनी
पुरुषांमध्ये